महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा -२०१९

**क्रमांक : एडीव्ही ३११९/सीआर-६०/२०१८/तीन** **जाहिरात क्रमांक : ०२/२०१९**

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग संवर्गातील १९० पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **रविवार, दिनांक ७ एप्रिल, २०१९** रोजी **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०१९** औरंगाबाद, मुंबई व नागपूर या जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल.

**२.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**३.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुख्य परीक्षा रविवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०१९ रोजी किंवा त्यानंतर आयोजित होण्याची शक्यता आहे .

**४.** पदसंख्येत शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येमध्ये बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल.

**५.** पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील व अशा सुधारित/अतिरिक्त मागणीपत्रांचा तपशील मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

**६. वेतनश्रेणी** : - (१) रुपये २७,७०० – ४४,७७० अधिक नियमानुसार देय भत्ते. (२) वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**७. पात्रता :-**

**७.१ वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता यांचेकरिता :-**

**७.१.१ वयोमर्यादा** :- दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ रोजी वय २१ वर्षांपेक्षा कमी आणि ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

**७.१.२ अर्हता** : -

(१) विधी शाखेतील पदवी आणि मुंबई उच्च न्यायालयातील किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयातील दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ रोजी वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून किमान ३ वर्षांचा वकिली व्यवसायाचा अनुभव.

(२) पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावरील महाराष्ट्रातील सेवा न्यायालयीन व्यवसाय म्हणून समजली जाईल

**किंवा**

**७.२ नवीन विधी पदवीधरांकरिता** :-

**७.२.१ वयोमर्यादा** :- दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ रोजी वय २१ वर्षांपेक्षा कमी आणि २५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

**७.२.२ अर्हता :-**

(१) विधी शाखेतील पदवी. सदर पदवी प्राप्त करण्यासाठी घेण्यात येणारी प्रत्येक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन पदवी प्राप्त केली असली पाहिजे आणि

(२) विधी पदवीचे अंतिम वर्ष किंवा विधीमधील पदव्युत्तर पदवीचे अंतिम वर्ष (LL.M.) किमान ५५ % इतक्या गुणांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक

**किंवा**

**७.३** उच्च न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य, उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य, मंत्रालयाच्या विधी व न्याय विभागाच्या विधी विभागामध्ये विधी सहायक आणि त्यापेक्षा उच्च पदावर काम करणा-या कर्मचारी वर्गाचे सदस्य, उच्च न्यायालय शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालये यामधील सरकारी वकीलांच्या कार्यालयातील सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य

**७.३.१** दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ रोजी वय २१ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**७.३.२** विधी पदवी प्राप्तीनंतर दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत किंवा तत्पूर्वी किमान ३ वर्षाची सेवा झालेली असणे आवश्यक आहे.

**७.४ मराठी भाषेचे ज्ञान :-**

**७.४.१** सर्व उमेदवारांना मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता व लिहिता येणे आवश्यक असून मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान, त्याचप्रमाणे मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक आहे.

**७.४.२** मराठी भाषेच्या ज्ञानाबददलचे प्रमाणपत्र खालील प्राधिका-यांकडून प्राप्त करणे आवश्यक आहे :-

(१) वकिल, ॲटर्नी किंवा अधिवक्ता - संबंधित जिल्हयाचे मुख्य न्यायाधीश.

(२) नवीन विधी पदवीधर - विधी अभ्यासक्रमासाठी (**LL.B./LL.M.**) प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे विभागप्रमुख.

(**३**) उच्च न्यायालय आणि त्यास दुय्यम न्यायालये, मंत्रालय इत्यादी विभागातील कर्मचारी—ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवेत आहे असा विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

(४) विशेष परिस्थितीत पुनर्नियुक्त/ सेवानिवृत्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर )

**७.५** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

**७.६** प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन निश्चित केलेल्या दिनांकापर्यंत संपादन केलेली अर्हता तसेच अनुभव सदर पदासाठी पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल.

**७.७** सक्षम विद्यापीठाकडून संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकास शैक्षणिक अर्हता संपादन केली आहे असे समजले जाईल.

**७.८** अंध उमेदवार सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**८. परीक्षेचे टप्पे -**

**८.१** प्रस्तुत परीक्षा खालील तीन टप्प्यात घेण्यात येईल :-

(१) पूर्व परीक्षा - १०० गुण

(२) मुख्य परीक्षा - २०० गुण

(३) मुलाखत - ५० गुण

**८.२** पूर्व व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा योजना इत्यादी संदर्भातील तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**८.३ पूर्व परीक्षा** :-

**८.३.१** परीक्षेचे स्वरुप :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी, प्रश्नपत्रिका-एक.

**८.३.२** एकूण गुण - **१००**

**८.३.३** परीक्षेचे माध्यम- इंग्रजी

**८.३.४** पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम :-

(**१**) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (**२**) सिव्हिल प्रोसिजर कोड (**३**) इव्हिडन्स ॲक्ट (**४**) ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट (**५**) स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट (**६**) महाराष्ट्र रेन्ट कन्ट्रोल ॲक्ट (**७** ) लिमिटेशन ॲक्ट (**८** ) कॉन्स्टिटयुशन ऑफ इंडिया (**९**) इंडियन पिनल कोड (**१०**) लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुडस ॲक्ट ॲन्ड पार्टनरशिप ॲक्ट.

**८.३.५** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या उददेशाने घेण्यात येईल. गुणवत्तेनुसार एकूण पदसंख्येच्या साधारणपणे दहा पट उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात येतील.

**८.३.६** पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्याने पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच ते उमेदवारांनाही कळविले जाणार नाहीत.

**८.४ मुख्य परीक्षा** :-

**८.४.१** परीक्षेचे स्वरुप :- पारंपरिक

**८.४.२** एकूण गुण. **२००**

**८.४.३** प्रश्नपत्रिका – दोन. प्रत्येकी **१००** गुणांचे दोन पेपर

**८.४.४** परीक्षेचे माध्यम- मराठी व इंग्रजी

**८.४.५ मुख्य** परीक्षेचा अभ्यासक्रम :-

**पेपर क्रमांक १** :- (**१**) सिव्हिल प्रोसिजर कोड (**२**) ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट (**३**) स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट (**४**) लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुडस ॲक्ट ॲन्ड पार्टनरशिप ॲक्ट.

**पेपर क्रमांक २** :- (**१**) इंडियन पिनल कोड (**२**) एव्हिडन्स ॲक्ट (**३**) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (**४**) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम-१९८९ व नागरी हक्क संरक्षण अधिनियम-१९५५ (**५**) कायदेविषयक ताज्या घडामोडीबाबत निबंध (अंदाजे ८०० शब्दांचा)

**८.५ मुख्य परीक्षेचा निकाल** :-

**८.५.१** यशस्वी उमेदवारांना उपलब्ध रिक्त पदांच्या १:३ या गुणोत्तर प्रमाणात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तसेच १:३ हे गुणोत्तर प्रमाण ठेवण्यासाठी सेवाभरती प्राधिकरणाने निश्चित केलेले एकसमान अंतिम गुण ज्यांनी मिळविले असतील असे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**८.५.२** मुलाखतीस बोलविण्यासाठी पात्र होण्याकरीता प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान **५०** टक्के गुण मिळविणे ही किमान अर्हता राहील.

**८.५.३** महाराष्ट्र शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या जातीमधील उमेदवारांच्या बाबतीत प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान **४५** टक्के गुण मिळविणे ही मुलाखतीस बोलविण्याकरीता पात्र होण्यासाठी किमान अर्हता राहील.

**८.६** मुलाखत – **५०** गुण :- मुलाखतीत **४०** % अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांचाच फक्त अंतिम निवडीसाठी विचार केला जाईल.

**८.७** अंतिम निवड :- लेखी मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

**९. प्रतीक्षा यादी** :-

प्रस्तुत पदाचा अंतिम निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून १ वर्ष किंवा पुढील परीक्षेच्या अंतिम निकालाच्या दिनांकापर्यंत यापैकी अगोदर जे घडेल तो पर्यंत प्रतीक्षा यादी कार्यान्वित राहील.

**१०. खालीलपैकी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही**:-

**१०.१** न्यायिक सेवेतून किंवा शासनाच्या किंवा सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून सक्तीने निवृत्त करण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा न्यायिक सेवेतील किंवा शासनाच्या किंवा सांविधिक अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील कोणत्याही पदाचा परिविक्षा कालावधी पूर्ण केला नसेल किंवा

**१०.२** नैतिक अधोगतीचा समावेश असणा-या गुन्हयांच्या अपराधासाठी सिध्दपराधी ठरविण्यात आले असेल किंवा उच्च न्यायालय किंवा संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेस बसण्यापासून कायमचे प्रतिरोधित केले असेल किंवा अपात्र ठरविले असेल अथवा ठरविण्यात आले असेल किंवा

**१०.३** उमेदवारीकरिता सेवाभरती प्राधिकरणावर कोणत्याही मार्गाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रभाव टाकला असेल किंवा

**१०.४** उमेदवार पुरुष असेल व त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी असतील आणि उमेदवार स्त्री असेल तर हयात पत्नी असलेल्या पुरुषाशी स्त्रीने विवाह केला असेल किंवा

**१०.५** दोनपेक्षा अधिक मुले असतील.

**११. सेवाप्रवेशोत्तर शर्ती** :-

**११.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**११.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**११.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

**११.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

**११.२** प्रस्तुत पदावर नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्षे कार्यरत राहणार आहे, याबाबतचे रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख ) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

११.३ प्रस्तुत पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीला कोणत्याही न्यायालयात किंवा त्या न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयात सेवेत असताना सेवा समाप्ती झाल्यापासून दोन वर्षापर्यंत वकिली व्यवसाय करण्यास प्रतिरोध करण्यात येईल आणि सेवा समाप्त झाल्यापासून अशा न्यायालयांमध्ये दोन वर्षासाठी वकिली व्यवसाय करणार नाही, असे लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

११.४. प्रस्तुत पदावरील नियुक्ती तीन वर्षाच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल.

**१२. शुल्क रुपये :** १२.१ :- अमागास - **३७४/-** १२.२ :- मागासवर्गीय - **२७४/-**

**१३. अर्ज करण्याची पद्धत :-**

१३.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

१३.२ पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ ते २१ फेब्रुवारी, २०१९** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

१३.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१३.४ आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

१३.५ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

१३.६ **आयोगास** अर्ज सादर **केल्यानंतर विहित मुदतीत** परीक्षा शुल्क **भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही**.

१३.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

१३.७.१ शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक करावे.

१३.७.२ '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर '**माझे अप्लिकेशन**' सदरातील '**स्पर्धात्मक परीक्षा**'या लिंक वर क्लिक करावे.

१३.७.३ '**स्पर्धात्मक परीक्षा**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. '**Unpaid**' **लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर** ' **Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

१३.७.४ '**Pay Now** ' या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

१३.७.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन **परीक्षा शुल्क अदा करता येईल**.

१३.७.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. **सदर** कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

१३.७.७ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

१३.७.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर **केल्यास** त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१३.७.९ विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे आवश्यक आहे.

१३.७.१० चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

१३.७.११ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**१३.८ केंद्र निवड :-**

१३.८.१ परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता "माझे खाते" मधील संबंधित परीक्षेची निवड करावी. त्यानंतर "केंद्र निवडा" या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमतेइतक्या अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

१३.८.२ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुटटी अथवा रविवारचा असेल, तर सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करता येईल.

१३.८.३ वरीलप्रमाणे केंद्र निवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हा केंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हा केंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

१३.८.४ जिल्हा केंद्र अथवा उपकेंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**१४. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**

१४.१ फक्त अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित व किमान ४०% कायमस्वरुपी दिव्यांगत्व असलेल्या पात्र उमेदवारांना, ते लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास, परीक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार आयोगाच्या पूर्व परवानगीने लेखनिकाची मदत घेता येईल व आयोगाच्या पूर्व परवानगीने अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.

१४.२ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१४.३ लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

१४.४ अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

१४.५ लेखनिक व अनुग्रह कालावधीसंदर्भात दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

१४.६ परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१४.७ दिव्यांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत मार्गदर्शक सूचना, विविध अर्जांचे नमुने, विशेष सूचना, संबंधित शासन आदेश इत्यादी बाबी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "विकलांग (दिव्यांग) व्यक्ती'" या सदरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, त्यांचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करावे.

**१५. प्रवेशप्रमाणपत्र :-**

१५.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१५.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१५.३ परीक्षेस येतेवेळी ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची रंगीत छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१५.४ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

१५.५ नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१६. परीक्षेस प्रवेश**

१६.१ **फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व ओळखीच्या पुराव्याची रंगीत छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

१६.२ स्मार्ट वॉच, डिजीटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

१६.३ आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा संबंधित शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**१७. बायोमॅट्रिक पडताळणी :**

१७.१ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या बायोमॅट्रिक सत्यापनासाठी **(Genuineness)** डिजिटल स्वरुपात उमेदवारांच्या बोटांचे ठसे आणि/अथवा बुब्बुळाच्या आधारे पडताळणी केली जाईल.

१७.२ बायोमॅट्रिक पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी त्यांच्या बोटांचे ठसे योग्यरित्या स्वीकारले गेले असल्याची खात्री करावी.

१७.३ बायोमॅट्रिक पडताळणीवेळी विसंगती आढळून आल्यास उमेदवारी नाकारली जावू शकते. तसेच पडताळणीच्यावेळी उमेदवार अस्सल नसल्याचे **(not genuine)** आढळून आल्यास कायदेशीर कारवाईव्यतिरिक्त उमेदवारी रद्द होवून, शिवाय आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधाची कारवाई होवू शकते.

१७.४ **परीक्षेच्यावेळी बायोमॅट्रिक पडताळणीकरीता अडचण निर्माण होवून परीक्षेस प्रवेश नाकारला जावू नये, याची उमेदवाराने स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याकरीता परीक्षेच्या दिवशी उमेदवाराने** हातावर मेहंदी, शाई, रसायन इत्यादी प्रकारची कोणतीही बाहयवस्तु/पदार्थ लावू नये.

१७.५ उमेदवारांनी आधार क्रमांक त्यांच्या खात्यात नमूद केले असले तरी काही उमेदवारांनी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉक / अनलॉक सुविधेद्वारा त्यांची आधार क्रमांकाशी संलग्नित बायोमेट्रीक माहिती लॉक केली असल्यास त्यांचे परीक्षेच्या वेळी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व पर्यायाने बायोमेट्रिक पडताळणी न होण्याची शक्यता आहे. परीक्षेच्या वेळी आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता उमेदवारांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक केली असणा-या उमेदवारांनी परीक्षा / मुलाखत / शारिरीक चाचणीस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी. अन्यथा परीक्षा / मुलाखतीकरीता उमेदवाराला प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

१८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षेची योजना**" विभागातील '**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेची परीक्षा योजना**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

१९. सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : १ फेब्रुवारी, २०१९

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.